**पोलीस अधीक्षक, अकोला यांचे कार्यालय,**
**महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश - २०१५**

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी सन २०१५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ०५ दिनांक २८ एप्रिल २०१५ अन्वये महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश, २०१५ संपुर्ण राज्यासाठी लागु केलेला आहे. त्याच अनुषंगाने गृह विभाग, महाराष्ट्र शासनाने दिनांक १० जुलै, २०१५ रोजी सदरच्या अध्यादेशाचे प्रयोजनार्थ त्याचे अधिनस्त असलेल्या कार्यासनांमार्फत तसेच, पोलीस आयुक्त कार्यालय, पोलीस अधीक्षक कार्यालये व त्याच्या अधीनस्त असलेल्या विविध कार्यालयामार्फत मात्र नागरिकांना पुरविण्यात येत असलेल्या लोकसेवा, नियत कालमर्यादा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम आणि व्दितीय अपील प्राधिकारी या बाबी अधिसुचित केलेल्या आहेत. सदरचा अध्यादेश लागू केलेल्या दिनांकापासून म्हणजे महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश, २०१५ च्या कलम ३ (१) नुसार गृह विभागाने अधिसुचना लागू केलेली आहे.

२. सदर प्रकरणामध्ये प्रधान सचिव (विशेष) गृह विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई यानी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश, २०१५ व अधिसुचना प्रमाणे अधिनस्त असलेल्या विविध कार्यालयामार्फत मात्र नागरिकांना पुरविण्यात येत असलेल्या लोकसेवा, नियत कालमर्यादा, पदनिर्देशित प्राधिकारी, प्रथम आणि व्दितीय अपील प्राधिकारी या बाबी निर्देशित करण्याच्या सुचना दिलेल्या आहेत. त्या अनुषंगाने पोलीस अधीक्षक, अकोला यांचे कार्यालय यांचे अधिनस्त असलेल्या पोलीस अधीक्षक कार्यालय (खुद्द), उपविभागीय पोलीस अधीकारी, पोलीस ठाणे व इतर शाखा यांना अध्यादेशाची अंमलबजावणी करण्याचे हेतुने खालीलप्रमाणे लोकसेवक, नियत कालमर्यादा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व व्दितीय अपील प्राधिकारी यांचे बाबी सुचित करण्यात येत आहेत.

| **अ. क्र.** | **लोकसेवेचा तपशिल** | **लोकसेवा पुरविण्यासाठी विहीत केलेली कालमर्यादा** | **पदनिर्देशित अधिका-याचे पदनाम** | **प्रथम अपील अधिका-याचे पदनाम** | **व्दितीय अपिल अधिका-याचे पदनाम** |
|---|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** | **५** | **६** |
| ०१ | तक्रारदारास प्रथम खबरी अहवालाची (एफआयआर) प्रत पुरविणे. | नोंदणी नंतर तात्काळ | पोलीस ठाणे अंमलदार | पोलीस ठाणे अधिकारी | उपविभागीय पोलीस अधिकारी |
| ०२ | ध्वनिक्षेपकाच्या (लाऊडस्पिकर) परवाना देणे. | कार्यालयीन कामकाजाचे ०३ दिवस | पोलीस निरीक्षक (पो. ठाणे अधिकारी) | उपविभागीय पोलीस अधिकारी | अपर पोलीस अधीक्षक |
| ०३ | मनोरंजनाचे कार्यक्रमांना ना हरकत परवाना देणे. | कार्यालयीन कामकाजाचे २१ दिवस | कार्यालयीन अधीक्षक | पोलीस उपअधिक्षक मुख्यालय | पोलीस अधीक्षक |
| ०४ | सभा, संमेलन, मिरवणूक, शोभायात्रा इ. करिता परवानगी देणे. | कार्यालयीन कामकाजाचे ०७ दिवस | पोलीस ठाणे अधिकारी/ उपविभागीय पोलीस अधिकारी/ पोलीस उपअधिक्षक मुख्यालय | उपविभागीय पोलीस अधिकारी | पोलीस अधिक्षक |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ०५ | विदेशी नागरिकांना निवासासाठी मुदतवाढ देणे/ नाहरकत प्रमाणपत्र देणे. | कार्यालयीन कामकाजाचे ०७ दिवस | पोलीस निरीक्षक जिल्हा विशेष शाखा | पोलीस उपअधिक्षक मुख्यालय | पोलीस अधिक्षक |
| ०६ | भारत देशात परत येण्यासाठी ना हरकत प्रमाणपत्र देणे. | कार्यालयीन कामकाजाचे ०७ दिवस | पोलीस निरीक्षक जिल्हा विशेष शाखा | पोलीस उपअधिक्षक मुख्यालय | पोलीस अधिक्षक |
| ०७ | पारपत्र पडताळणी साठी ना हरकत प्रामणपत्र देणे. | कार्यालयीन कामकाजाचे २१ दिवस | पोलीस निरीक्षक जिल्हा विशेष शाखा | पोलीस उपअधिक्षक मुख्यालय | पोलीस अधिक्षक |
| ०८ | निमशासकीय, खाजगी संस्था इत्यादी मध्ये नोकरी करिता वर्तणूक व चारित्र पडताळणी प्रमाणपत्र देणे. | कार्यालयीन कामकाजाचे ३० दिवस | पोलीस निरीक्षक जिल्हा विशेष शाखा | पोलीस उपअधिक्षक मुख्यालय | पोलीस अधिक्षक |
| ०९ | पेट्रोल पंप, गॅस एजन्सी, हॉटेल, बार इत्यादी करिता ना हरकत प्रमाणपत्र देणे. | कार्यालयीन कामकाजाचे २१ दिवस | पोलीस निरीक्षक जिल्हा विशेष शाखा | पोलीस उपअधिक्षक मुख्यालय | पोलीस अधिक्षक |
| १० | शस्त्र परवान्यासाठी ना हरकत प्रमाणपत्र देणे. | कार्यालयीन कामकाजाचे २१ दिवस | पोलीस निरीक्षक जिल्हा विशेष शाखा | पोलीस उपअधिक्षक मुख्यालय | पोलीस अधिक्षक |
| ११ | भारतीय नागरिकांना परदेशात जाण्यासाठी पोलीस अनुमती प्रमाणपत्र देणे. (शिक्षणासाठी/ नोकरीसाठी व्हिसा) | कार्यालयीन कामकाजाचे २१ दिवस | पोलीस निरीक्षक जिल्हा विशेष शाखा | पोलीस उपअधिक्षक मुख्यालय | पोलीस अधिक्षक |
| १२ | तिबेटीय नागरिकांना भारत देशात परत येण्यासाठी ना हरकत प्रमाणपत्र देणे | कार्यालयीन कामकाजाचे १५ दिवस | पोलीस निरीक्षक जिल्हा विशेष शाखा | पोलीस उपअधिक्षक मुख्यालय | पोलीस अधिक्षक |

३. वरील नमुद प्रमाणे महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश २०१५ च्या कलम ३ (१) नुसार गृह विभागाने अधिसुचना लागू केलेली आहे. सदर अधिसुचनेची अंमलबजावणी ही तात्काळ अंमलात आणावी. त्याप्रमाणे त्याचे अधिपत्याखालील सर्व पोलीस ठाणे अंमलदार/ पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी/ शाखा प्रभारी अधिकारी/ उपविभागीय पोलीस अधिकारी याबाबत प्राथम्याने सुचना देण्यात याव्या. त्याचप्रमाणे सदरच्या अधिसुचना/ कायदयाचे अनुषंगाने सदरची माहिती ही पोलीस ठाणे/ कार्यालयाचे प्रथमदशर्नी भागामध्ये सर्वसामान्य नागरिकांना यांची माहिती होण्यासाठी आवश्यक ते फलक लावण्यात यावेत.

४. सदर प्रकरणी शासनाने लागू केलेल्या महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश, २०१५ या कायदयाचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्यावी, त्याचप्रमाणे सदर प्रकरणात उल्लंघन झाल्यास कायदयानुसार कार्यवाही करण्यात येईल याचीही कृपया नोंद घेण्यात यावी. सदर प्रकरणात महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश - २०१५ हा कायदा महाराष्ट्र शासनाचे अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेले आहे.